# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## मुमाआ नो.क्र./२२०४१०/अ.क्र.४४२६/२०२६

श्री. राजेश जगदंबा पांडे
रुम नं.१८, बी.डी.डी. चाळ नं६३,
भागोजी वाघमारे मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक विकास विभाग चाळी,
बी.डी.डी. चाळ क्र. ५१, जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक विकास विभाग चाळी,
बी.डी.डी. चाळ क्र. ५१, जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०६.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.१२.२०२० | -- | ०५.०१.२०२१ | -- |

अपिलार्थीनी दिनांक ०१/१२/२०२० रोजी दि.१२.१०.२०१७ ते माहिती अर्ज दाखल करण्याच्या दिनांकापर्यंत दिनांक १९.१०.२०२० रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर काय कारवाई केली याबाबत माहिती मागितली असून माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक ०५/०१/२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज व दिनांक ०९/०२/२०२१ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. तसेच हायब्रीड अथवा ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहण्याची सुविधा असतानाही ते उपस्थित नाहीत. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीना त्यांच्या दिनांक ०१/१२/२०२० रोजीच्या मूळ माहिती अर्जातील माहिती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल क्र.४४२६/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**
**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०१-०६-२०२६**

Jyotsna